# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 29/01/2024

| अ. क्र | पो.स्टे. | गु.र.नं.व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला तारीख वेळ | गुन्हा दाखल तारीख वेळ | फिर्यादीचे नाव व पत्ता | अटक/पाहीजे आरोपीचे नाव | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रहिमापुर | 08/024कलम 341,323,504,506,34 भादवी | | 28/01/24 चे 08/30 वा वा दरम्यान | 28/01/24 चे 12/02 वा | महिला वय 48 वर्श, | 1.विलास मारोती पारडे, वय 50 वर्श, 2. महिला वय 45 वर्श रा. उमरी, ममदाबाद | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी ही तिचे पती सह नमुद घ ता वेळी व ठिकाणी त्यांचे शेतातील तुर काढण्याकरीता हेडंबा ट्रॅक्टर घेवून जात असताना आरोपी क्र. 1 हा समोरून आला व म्हटले की, मी तुम्हाला तुर काढू देत नाही असे म्हणून शिवीगाळ केली व जिवाचे कमी जास्त करून फसविण्याची धमकी दिली. फिर्यादी व तिचे पतीने समजाविले असता त्यांना लोटलाट करून फि चे उजव्या हाताला ओरखडून केस पकडून ओढताण केली व ट्रॅक्टर समोर रस्त्यावर झोपून रस्ता अडविला. तसेच आरोपी क्र. 2 हीने शिवीगाळ केली व फि चे वडीलास तुम्हाला मार खायचा असेल तर येथे थांबा अशी धमकी दिली. अशा फी चे जबानी रिपोर्ट व मेडीसर्टीवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 2 | दत्तापुर | 20/24 कलम 354, 354 ड 506, भादवी सहकलम 8, 12 पोस्को | हिंगनगाव कसारखेड रेल्वे 04 किमी पुर्व | 28/01/024 चे 15.00 ते 15/30 वा | 28/01/24 चे 21.20 | महिला वय 16 वर्षे | सौरभ शिवा गिरी वय 22 वर्षे रा. हिंगणगांव कासारखेड | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकाणी यातील आरोपी यांने काल दि 27/01/2024 रोजी फिर्यादी हि गावातीलच दुकानात सामान आणण्या करीता गेली असता सदर गुन्हयातील नमुद आरोपी हा तेथे आला व नमुद आरोपीने वाईट उद्‌देशाने हात पकडला त्यामुळे फिर्यादी हि घाबरून हात झटकुन पळुन गेली व आज दि 28/01/2024 चे दुपारी 03.00 फिर्यादी ही गावातील ओळखीच्या नागरीकाचे शेतामधे जेवनाचा कार्यक्रम असल्याने जेवन करून फिर्यादीची बहीनी तन्वी हिचे सोबत जेवुन करून घरी जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करून तु माझे सोबत बोलत नसल्याने आरोपीने रेल्वे पटरीवर जावुन आत्महत्या करण्याची धमकी दिली. यातील नमुद आरोपी फिर्यादीचा वाईट उद्देशाने हात पकडुन विनयभंग करून व मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 3 | बेनोडा | 07/24 कलम 324,504,506 भादवी | ग्राम वंडली 26 कीमी उत्तर | 28/01/2024 चे 10.30 वा दरम्यान | 28/01/2024 चे 17.07 वा दरम्यान | शालीकराम भीमराव बासंद्रे वय 50वर्श रा वंडली | ज्ञानेश्वरराव तुळसीराम बीसांद्रे वय 66 रा वंडली | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकाणी यातील फीर्यादी व आरोपी चे शेत शेजारी असुन नमुद घ ता वेळी व ठिकाणी फीर्यादी हा त्याची बैलबंडी रस्त्याने घेवुन जात असतांना आरोपीने फीर्यादीस म्हटले की तु या रस्त्याने बैलगाडी का घेवुन जात आहे असे म्हणुन शिवीगाळ केली व शेताच्या बाजुला असलेली काठी उचलुन फीर्यादीच्या डोक्याला मारून जख्मी केले अशा फीर्यादीच्या जबाणी रीपोर्ट व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | बेनोडा | 08 / 24 कलम 324,504,506 भादवी | ग्राम वंडली 26कीमी उत्तर | 28 / 01 / 024 चे 10.30 वा दरम्यान | 28 / 01 / 24 चे 17.19 वा दरम्यान | ज्ञानेश्वरराव तुळसीराम बीसांद्रे वय 66 रा वंडली | शालीकराम भीमराव बासंद्रे वय 50 वर्श रा वंडली | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकाणी यातील फीर्यादी व आरोपी चे शेत शेजारी असुन नमुद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी हा त्याची बैलबंडी फीर्यादी चे शेतातुन घेवुन जात असतांना फीर्यादीने आरोपीला म्हटले की तु माझे शेतातुन बैलगाडी का घेवुन जात आहे असे म्हटले म्हणुन आरोपी याने शिवीगाळ केली व शेताच्या बाजुला असलेली काठी उचलुन फीर्यादीच्या मांडीवर व पाटीवर मारून जख्मी केले अशा फीर्यादीच्या जबाणी रीपोर्ट व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 5 | वरूड | 43 / 24 कलम 379 भादवी | हिना धरम काटा वरूड 05 कीमी पश्चिम | 12 / 01 / 24 चे 12.00 वा ते13 / 01 / 24 चे 8.00 वा दरम्यान | 01 / 2024 चे 18 / 57 वा | रीयाज खॉ बशीर खॉ रा. रामनगर घटोळे प्लॉट वरूड | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील नमुद फि यांची आयशर गाउी क MH27X7313 चे गाडीचे स्टेअरींग वर फि हे स्वता बसुन चाबी लावुन सुरू करत असतांना गाडी सुरू होत नव्हती म्हणुन फि यांना खाली उतरून पाहीले तर गाडीचे डिझेल टाकीतुन खाली सांडलेल दिसले म्हणुन डिझेल टाकीचा पाहणी केली असता टाकीचा खालचा नट खोललेला दिसला तेव्हाच फि यांच्या लक्षात आले की डिझेलटाकीतील अंदातजे 175 लिटर डिझेल कोणीतीरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे त्याचा आजपावेतो आजुबाजुला शोध घेतला असता डिझेल चोरणा–याचा शोध लागला नाही. अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 6 | तिवसा | 30 / 24 कलम 324,504 भादवी | ग्राम भारसवाडी जनावराच्या पिण्याचे पाण्याचे हौदाजवळ 15 किमी दक्षिण | 27 / 01 / 24 चे 22.00 ते 22.30 | 28 / 01 / 2 चे 17.20 | निलेश सुरेशराव अळसपुरे वय–28 रा भारसवाडी धंदा–शेती | प्रविणमधुकरराव अळसपुरे रा भारसवाडी | हकीकत अशा प्रकारी आहे की यातील नमुद फि हे भारसवाडी येथे जनावराचे पिण्याचे पाण्याचे हौदाजवळ उभे असता नमुद आरोपी हा तेथे आला व फिस म्हणाला कि येथे का थाबंला हे काय तुझया बापाचे जागा आहे का असे म्हटले असता फिर्यादी नी त्यावर फिर्यादी नी म्हटले कि, असा का बोलत आहे तर, आरोपी याने त्याला लोंबाझोबी करून फिस खाली पाडले व त्याचे उजव्यापायाचे मांडीला चावा व मानीवर वरखडले आहे अश्या फि चे जबानी रीपोर्ट वरून व मेडी सर्टी वरून गुन्हा नोंद. |
| 7 | तिवसा | 31 / 24 कलम 324,504,34, भादवी | ग्राम निभोंरा की मी 18 पुर्व | 28 / 01 / 24 चे सायं 07.00 वा | 28 / 01 / 24 चे | दर्शन बंडुजी जाधव वय 25 वर्ष धंदा मजुरी रा. निभोंरा तिवसा | 01. राहुल अशोकराव ढगे 02. अशोकराव भाउराव ढगे दोन्ही रा निभोंरा तिवसा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी याच्या लहान भावाला आरोपी कं 01 याच्या भावाने बक–या चारण्याच्या कारणावरुन शिवीगाळ व थापडा बुक्यानी मारहाण केली होती नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी व तेचे वडील यांनी माझे भावाला मारहान का केली असे विचारण्यास गेले असता यातील नमुद आरोपी यानी फिर्यादी च्या वडीलावर मारण्यास गेले असता फिर्यादी मध्ये गेले असता तेव्हा आरोपी यानी फिर्यादी मध्ये अडवीण्यास गेला तव्हा आरोपी यानी फिर्यादी यास नालीत पाडुन लाथा बुक्यानी मारहान केली तसेच फिर्यादीच्या डोक्यावर दगड मारुन डोक्यातुन रक्त निघाले व अंगावर मुका मार माला आहे अशा अर्ज च्या जबानी रिर्पोट वरुन व मेडी सर्टी वरुन सदर चा गुन्हा नोंदुन तपासत घेतला |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | आसेगाव | 18/24 कलम 324, 506 भादवि | निरूगंगामाई 15 किमी पुर्वस | 28/01/2024 चे 07.30 वा दरम्यान | 28/01/24 चे 13.35 वा दरम्यान | उमेश रमेश म्हस्के वय 36 रा निरूळगंगामाइ ह मु रोहा ता रोहा जि रायगड | मंगेश रमेश म्हस्के वय 30 रा निरूळगंगामई | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फीर्यादी हे बाहेरगावी चालक म्हणून काम करतात. घटना ता वेळी फिर्यादी हे त्यांच्या घरी आले मुलीला सोबत बोलत असतांना यातील आरोपीने फि ला म्हटले की तु कशाला माझ्या घरी आला असे म्हणून आरोपीने बाथरूमचे कूपंनाची लाकडी काठी काढून फि चे डोक्यावर व हातावर मारुन जखमी केले अशा फि चे जबानी रि व मेडीसटी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 9 | कु–हा | 23/024 कलम 379 भादवी | ग्राम मसदी शेतशिवार 08 किमी दक्षिन | 27/1/24 चे रात्री दरम्यान | 28/1/24 चे 14/34 वा | शेख जाकीर ख गब्बु वय46रा ताजनगर नं 2 नुरइस्लाम मस्जीद जवह अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी जवळ एकुन 13 जनावरे आहे ते त्याच्या शेतातील गोठयात असतात त्याचे शेतात चौकीदार असतो फिर्यादी नमुद घता वेळी व ठीकानी फिर्यादी चे शेतातील चौकीदार यानी त्याना कॉल करुन माहीती दिली की 13 जनावरा पैकी 5 जनावरे तेथे दिसुन आली नाही व कपांउडचे तार कापलेले दिसत आहे शेतातील गोठयातुन 2 गाई 1 वासरु 2 गोरे असा एकुन 39000 रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| 10 | चांदुर रेल्वे 40/24 कलम 379 भादवी | | गजानन वाशिंग सेंटर विरूळ रोंघे चांदुर रेल्वे | 26/01/24 चे 12/30 ते 16/00 वा दरम्यान | 28/01/24 चे 18/26 वा | साजन उर्फ सोमे वर बाळु भगत वय 30 रा. नेहा कॉलनी चांदुर रेल्वे | अज्ञात | हकीकत अशी की यातील फिर्यादी यांनी त्यांची मोसा वाशींग करीता दिलेली होती ही मोसा दुचाकी वाहन बुलेट क mh 27 bc 5268 कि. अंदाजे 80,000 रू. ची अज्ञात चोरटयाने चोरून नेली वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपसात घेतला |
| 11 | धारणी | 72/24 कलम 279 337 338 304 अ भादवि | बसपानी फाटा धारणी ते परमवाडा रोड वर दक्षिण 3 कि मी | 26/01/24 चे 07/30 वा दरम्यान | 28/01/24 चे 16/49 | बिसराम सानु दारसिंबे वय 48 वर्श रा कुटंगा ता धारणी | एम एच 11 बी एच 8080 इनोव्हा फोर व्हिलर कार चा चालक गंगाधर उकीनकर वय 49 रा चिरपुरा वार्ड न 09 सावनेर ता सावनेर जि नागपुर | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फि चा मुलगा राजु बिसराम दारसिंबे हा दि 26/01/2024 रोजी धारणी वरून कुटंगा येथे किरानाचे सामान घेवुन जात असता परतवाडा कडुन धारणी कडे येणारी एम एच 11 बी एच 8080 इनोव्हा फोर व्हिलर कार चा चालकाने यातील फि चे मुलाचे हिरोहोंडा मो सा क्रं एम एच 27 एन 5702 यास भरधाव वेगाने व लापरवाही ने धडक मारून गंभीर जख्मी केले त्यावरून फि चे मुलास जख्मी अवस्थेत सरकारी दवाखाना धारणी येथे भरती केले असता त्याची प्रकृती जास्त खराब असल्याने अमरावती येथे रेफर केले व दि 27/01/24 रोजी उपचारा दरम्यान मरण पावला असा फि चे जबानी रि वरून सदरची गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 12 | दर्यापुर | 62/024 कलम 279,337 भादवी | दर्यापुर ते अकोट रोडवरील साबळे जिन समोर 5 की मी पश्चीम | 20/1/2024 चे 04/30 वा | 28/1/2024 चे 17/08 वा | गौरव अशोक कुलट वय. 27 वर्श रा. गोळेगाव ता. दर्यापुर | मोसा क्र.एम एच 27 बी यु 4256चा चालक | अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे आपल्या मालकीची होन्डा शाहीन कंपनीची मोटर सायकल जिचा क एम एच 37 बी पी 4276 हीने दि.20/1/2024 रोजी सकाळी 04/30 वा दरम्यान वडनेर गंगाई वरुन दर्यापुर येथे परत येत असतांना दर्यापुर ते अकोट रोडवरील साबळे जिन समोरुन जात असतांना फिर्यादीचे मोटर सायकलचे मागुन आरोपीचे ताब्यातील मोटर सायकलने क्र.एम एच 27 बी यु 4256 चालक भरधाव वेगाने व |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | निश्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मो सा ला मागुन जोरदार धडक दिली त्यामुळे फिर्यादी हे मो सा वरुन खाली पडुन जखमी होउन उजवे हाताचे अंगठयाला व उजवे हाताचे गुटण्याला मार लागला अशा फीर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 13 | दर्यापुर | 63/024 कलम 279,337.304 अ भा द वी भादवी | दर्यापुर ते अमरावती रोडवर राधास्वामी संत्सग ते बुलढाणा अर्बन केअर हाउस च्या मधात 5 की मी पश्चीम | 28/1/2024 चे 19/30 वा | 28/1/2024 चे 23/40 वा | अजय दिपकराव आठवले वय. 24 वर्श रा. लासुर ता. दर्यापुर | एस टी वाहन क एम एच 40 वाय 5357 चा चालक | अशा प्रकारे आहे कीयातील नमुद घ ता वेळी फिर्यादी हे बाबुसा हॉटेल येथे कामा करीता हजर असतांना फी ला त्यांचा आतेभाउ अंकुश सुधाकर गवई रा माहुली धांडे याचा फोन आला व त्याने सांगीतले की सोनु सुकदान हा त्याचे मोटर सायकल ने दर्यापुर हुन घरी माहुली धांडे कडे त्याचा मित्र मंगेश नेतनराव सोबत जात असता त्यांचा अपघात झाला आहे फीर्यादी लगेच हॉटेल मधुन निघुन अपघात झालेल्या ठीकाणी दर्यापुर ते अमरावती रोडवर राधास्वामी संत्सग ते बुलढाणा अर्बन वेअर हाउस च्या मधात फी ला गर्दी दिसली लोकांकडुन फी यांना समजले की फी चा मावस भाउ सोनु उर्फे अनिल सुकदान हा त्याची होन्डा शाईन मो सा क एम एच 40 ए व्ही 3538 ने जात असता अमरावती कडुन येत असणा–या एस टी क एम एच 40 वाय 5357 चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पने चालवुन मो सा ला ड्रॉव्हर साईड ने ठोस मारल्याने ते दोघे खाली पडुन सोनु उर्फे अनिल सुकदान व मंगेश रामेश्वर नेतराम याला गंभीर मार लागल्याने सोनु उर्फे अनील सुकदान हा मरण पावला व त्याचा मित्र मंगेश नेतराव याला डॉ पठाण ऐकता हॉस्पीटल दर्यापुर येथे नुवुन भर्ती केल्याचे समजले अशा फीर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

**पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण**
**करीता**